# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.08.2025** **वार:शनिवार**

1. महिलांच्या सहभागानेचं विकसित महाराष्ट्र 2047चं उद्दिष्ट साध्य होईल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
2. राज्यातल्या विविध महापालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर
3. राज्याच्या बहुतांश भागात बैल पोळ्याचा सण उत्साहात साजरा आणि
4. खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभाची सांगता; 27 हजार स्पर्धकांचा सहभाग

**महिला आयोग**

विकसित महाराष्ट्र 2047 चं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण गरजेचं आहे; असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. राष्ट्रीय महिला आयोग आणि राज्य महिला आयोगानं संयुक्तपणे आयोजित केलेल्या शक्ती संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. या शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत विचार मंथन होत असून, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपसभापती नीलम गोऱ्हे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचं प्रकाशन करण्यात आलं. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**महिलांशी संबंधित विविध कायदे, महिलांशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारच्या योजना, लैंगिक समानता, महिलांवर होणारे अत्याचार अशा सर्व गोष्टींवर समग्र चर्चा करून त्याच्यावर कार्य योजना तयार करण्याचा प्रयत्न महिला आयोगातल्या विविध सदस्यांच्या अध्यक्षांच्या माध्यमातून या ठिकाणी केला जाणार आहे, आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीनंही या या संदर्भात काय काय उपाययोजना केलेल्या आहेत किंवा आपल्या योजना काय आहेत, या मी आणि आपल्या महिला बाल कल्याण मंत्री अदितीताई तटकरे आम्ही त्या ठिकाणी सर्वांसमोर मांडलेल्या आहेत. आणि असं आश्वस्त केलं आहे की हा जो काही संवाद आहे, या संवादातून देशभरातल्या महिला आयोगाच्या माध्यमातून जी कार्ययोजना तयार होईल, ती कार्ययोजना आम्ही महाराष्ट्रामध्ये त्या ठिकाणी पूर्ण करण्याचा प्रयत्न करू.**

**करार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित काल मुंबईत विविध क्षेत्रातील गुंतवणुकीचे 10 सामंजस्य करार करण्यात आले. त्यानुसार राज्यात 42 हजार 892 कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून याद्वारे 25 हजार 892 रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे. महाराष्ट्र हे 'डेटा सेंटर कॅपिटल' आणि 'सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल' म्हणून पुढे येत आहे. अनेक कंपन्या या क्षेत्रांत येत असून उत्पादन क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे; असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ब्रिटन समवेत झालेल्या रणनीतिक करारामुळे नवे दरवाजे उघडले असून भारतात अधिक गुंतवणूक होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**आढावा**

शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि अभियानांची प्रभावी अंमलबजावणी करत जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीत

महाराष्ट्र कुठेही मागे पडणार नाही, याबाबत यंत्रणांनी सतर्क राहावं असं त्यांनी सांगितलं. सामाजिक क्षेत्रा संबंधी वॉररूम मधील योजनांचा आढावा काल मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

**<u>अजित पवार</u>**

शासनातर्फे सुरू असलेला 150 दिवसांचा कार्यक्रम ही प्रशासकीय मोहिम नसून जनतेशी शासनाला जोडणारा सेतू आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं. जिल्हा परिषदेमार्फत आयोजित शंभर दिवस मोहिमेंतर्गत प्रमाणपत्र वितरण आणि सायकल बँक लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>कृषीमंत्री</u>**

कृषी विभागाने शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत, क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांची माहिती अधिकाधिक गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात दिल्या. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेत आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत ते बोलत होते. कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांना तातडीनं मार्गदर्शन मिळावं यासाठी किसान कॉल सेंटर सुरू करण्याची सूचना भरणे यांनी यावेळी केली.

**<u>प्रारूप प्रभाग रचना</u>**

राज्यातल्या विविध महापालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रारूप प्रभाग रचना काल जाहीर करण्यात आली. पुणे महापालिकेमध्ये चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार असून एकंदर 41 प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये 40 प्रभाग चार सदस्यीय, तर एक प्रभाग पाच सदस्यीय राहणार असून एकूण सदस्यसंख्या 165 असेल. या प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी येत्या 4 सप्टेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये प्रारूप रचनेनुसार चार सदस्यीय 32 प्रभाग असतील. शहरात 17 लाख 751 मतदार आहेत. नाशिक महापालिकेमध्ये यंदाही 31 प्रभागांत 122 सदस्य असतील. त्यातही 29 प्रभाग चार सदस्यीय असून प्रभाग क्रमांक 15 आणि 19 हे तीन सदस्यीय असणार आहेत. बाकी प्रभाग रचना जवळपास 2017 मधील प्रभाग रचनेप्रमाणेच असली तरी मतदारांची संख्या मात्र वाढलेली आहे. बीड आणि परभणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी देखील काल प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली.

**<u>ऑनलाइन गेमिंग विधेयक</u>**

ऑनलाइन गेमिंग प्रसार आणि नियमन विधेयक, 2025 ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल मंजुरी दिली. संसदेच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर करण्यात आलं. ई-स्पोर्ट्स आणि सोशल गेमला प्रोत्साहन देतानाच सर्व प्रकारच्या ऑनलाइन जुगार आणि रिअल मनी गेमवर बंदी आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकाचं विविध स्तरातून स्वागत होत आहे, मुंबईचे ब्रह्मदेव अतकरी यांची ही प्रातिनिधिक प्रतिक्रिया...

**केंद्र सरकारने आर्थिक गेमिंग प्लॅटफॉर्म बंद करण्याचा घेतलेला निर्णय ही काळाची गरज होती. अनेक कुटुंबे अशा गेमिंगच्या आहारी जाऊन आर्थिक अडचणीत सापडत होती. या धोरणामुळे आता लोक मेहनतीने मिळवलेला पैसा सुरक्षित राहील आणि तरुणाई चुकीच्या वचनापासून दूर राहील. समाजाची दिशा योग्य मार्गाने जाण्यासाठी हे एक दूरदर्शी पाऊल आहे. आम्ही या निर्णयाचे मनापासून स्वागत करतो.**

**<u>पोळा</u>**

राज्याच्या विविध भागात काल बैल पोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. वाशीम, सोलापूर, आणि नाशिकसह विविध जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात बैलांना अंघोळ घालून त्यांना सजवण्यात आलं; त्यानंतर त्यांची मिरवणूक काढून त्यांना गोडाधोडाचा घास भरवण्यात आला. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील वाई गोरखनाथ इथं दरवर्षी पोळ्याच्या करेनिमित्त महापोळा भरवला जातो; आज साजऱ्या होणाऱ्या या महापोळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.

जळगावमध्ये जैन हिल्सवर पारंपरिक पद्धतीनं पोळा सण साजरा झाला. यावेळी आदिवासी पारंपारिक नृत्य, ढोलताशांचं वादन करण्यात आलं. परभणी जिल्ह्यात बैल पोळ्याच्या सणावर अतिवृष्टीचं सावट दिसून आलं. सोनपेठ तालुक्यात सात बारा कोरा करावा या मुख्य मागणीसह विविध मागण्या करत शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला.

**पारंपरिक क्रीडा महाकुंभ**

परंपरागत देशी खेळांमुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम राहतं त्याचबरोबर या खेळांमुळे संस्कृती संवर्धनाचं कामही होतं असं प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केले. मुंबईत कुर्ला इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मैदानात आयोजित करण्यात आलेल्या ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभाचा काल समारोप झाला; त्यावेळी ते बोलत होते. कौशल्य आणि रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. कबड्डी, खो-खो, कुस्ती, विटी-दांडू, मल्लखांब, फुगडी यासह 18 देशी खेळांच्या या स्पर्धेत 27 हजार खेळाडूंनी भाग घेतला होता; त्यातील 450 खेळाडूंना काल पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यावेळी लेझीम लाठीकाठी, तलवारबाजी या साहसी खेळांची प्रात्यक्षिकंही सादर करण्यात आली.

**धरणसाठा**

सोलापूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात गेल्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील सर्व जलप्रकल्प पूर्ण क्षमतेनं भरले आहेत. अनेक प्रकल्पातील पाणी नदीत सोडलं जात असल्याने काही भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठे उजनी धरण यंदा पावसाळा संपण्यापूर्वीच पूर्ण भरलं आहे. त्यामुळे भिमा नदीत पाणी सोडण्यात आलं आहे. नाशिक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसाने पुन्हा एकदा नांदूर मध्यमेश्वरमधून मोठ्या प्रमाणावर पाणी जायकवाडीकडे रवाना करण्यात आलं आहे. दरम्यान जायकवाडी धरणात पाण्याची आवक वाढल्याने काल धरणाचे 18 दरवाजे उघडण्यात आले. त्यामुळे गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन इथल्या शनिमंदिराला पाण्याचा वेढा पडला आहे. गोदावरी नदी दुथडी भरून वाहू लागली असून नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यात कोयना आणि वारणा धरणातून सुरू असलेला पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. नदीची पाणी पातळी हळूहळू कमी होऊ लागली आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.